ग्रंथ सुरभि सदाफला । अध्यायावयव शुचि विमळा ॥
दृष्ट न व्हावी, घालि गळां । दिरुमणि माळा अवतरणिका ॥१४८॥
असो आतां अध्यायपद्धती । पंत हेमाड जी आचरिती ॥
ती कथितों यथामती । सादर श्रोतीं परिसावी ॥ १४९ ॥
प्रथमारंभीं सद्गुरुस्तवन । नंतर करिती वेदांत निरूपण ॥
साइ ब्रह्मस्वरूप वर्णन । अनुभवकथन तदनंतर ॥ १५० ॥
मुळचेच हेमाड व्युत्पन्न । त्यांत सद्गुरुसाइ प्रसन्न ॥
तत्क्षणिं केले प्रतिभासंपन्न । ग्रंथ पक्वान्न निर्मावया ॥ १५१ ॥
जें अनुभवितील याची गोडी । बंद तैंच जन्ममरणनाडी ॥
निर्वाण पदाची वतनवाडी । अक्षय्य जोडी मिळेल ॥ १५२ ॥
हेमाडांची रसाळ वाचा । साइप्रसादलाभ साचा ॥
योग पयइक्षुरसाचा । ग्रंथाचा थाट काय वानावा ॥ १५३ ॥
असतील बहुत ग्रंथकार । नये प्रसाद वाणीचा अधिकार ॥
जैं लाधे सद्गुरु साचार । विश्वाधार रमापती ॥ १५४ ॥
जरी केलें विद्याध्ययन । न निपजे ऐसें ग्रंथलेखन ॥
सद्गुरु कृपेवांचून । सत्य वचन त्रिवार ॥ १५५ ॥
कोण वानील श्रीसाईसच्चरिता । किती अनुपम ग्रंथ योग्यता ॥
लाधला हेमाडपंतासम कर्ता । परम सौभाग्यता मुमुक्षूंची ॥ १५६ ॥
यावत् ग्रंथ महीतळीं । तावत् कीर्ती भूमंडळीं ।
गोविंदरायें केली दिवाळी । वेळींच मुमुक्षू कारणें ॥ १५७ ॥
ग्रंथ बाप धन्य धन्य । साई सद्गुरु प्रसादजन्य ।
मुमुक्षु जीवां होईल मान्य । विचार दैन्य फेडील ॥ १५८ ॥

---

१ कामधेनू; २ इष्टमण्यांची माळ.

अनंतजन्मींचा सुकृत ठेवा । म्हणून घडली साई सेवा ।
मिळाला मधुर गोविंदरावा । मेवा ग्रंथलेखनाचा ॥ १५९ ॥
पंत हेमाड कट्टे भक्त । कवि, वेदांत-विद्यासक्त ।
साई सद्गुरु पदानुरक्त । दिवानक्त असती कीं ॥ १६० ॥
वेदांत विषय अति गहन । विरक्ति भक्ति ज्ञान जोड देऊन ।
ऐसा ग्रंथ करणें निर्माण । गुरुकृपेवीण दुर्घट ॥ १६१ ॥
अध्याय नव्हत हीं हेमकोंदणें । जडिलीं त्यांत कथा मोलरत्नें ।
त्यांतील अर्थ प्रभा किरणें । महा प्रयत्नें गोविंदरायें ॥ १६२ ॥
नाना अध्याय सुगंध सुमनमाळा । अर्पीतसें श्री साई सद्गुरु गळां ।
गोविंद मती प्रेमळ बाळा । निर्मळ भावें करूनी ॥ १६३ ॥
नाना अध्याय शुद्ध हेमकुंभ । त्यांत श्री साईच्चरित गंगांभ[१] ।
भरूनि ठेविती रघनाथडिंभ[२] । मुमुक्षुदंभ दवडावया ॥ १६४ ॥
नाना ग्रंथ रणांगण नभ । उभविती अध्याय यशस्तंभ ।
मर्दुनि असुर दर्पाभिमानदंभ । रघुनाथडिंभ मति खड्‌गें ॥ १६५ ॥
ग्रंथ रत्नजडित पंचारती । अध्याय कथार्थ स्नेहसूत्र ज्योती ।
विरक्ति शांति घेऊन येती । संतनृपतीं ओंवाळण्या ॥ १६६ ॥
ग्रंथमाया विश्वमोहिनी । अध्याय बाहू ऊंच उभवुनी ।
कथार्थ-केयूर-काय शृंगारुनी । सज्ज आलिंगनिं साइब्रह्मा ॥ १६७ ॥
साइ सच्चरित ग्रंथ सम्राट्‌ । अध्याय रम्य चतुर भाट ।
श्रद्धा, ज्ञान, वेदांत, थाट । वैभव अफाट वानिताती ॥ १६८ ॥
साइसच्चरित परमार्थ हाट । एकेक अध्याय त्यांतील पेठ ।
अनुभव कथा वस्तु दाट । रचिल्या नीट कविवर्यें ॥ १६९ ॥

१ गंगोदक; २ पुत्र.

ग्रंथ गंगापात्र विराट । अध्याय रचना सुबक घाट ।
कथा रसामृत प्रवाह अचाट । सामर्थ्य अफाट गुरुकृपेचें ॥ १७० ॥
ग्रंथ नव्हे हा कल्पवृक्ष । संसारजना वाटे रुक्ष ॥
मुमुक्षु भाविकां केवळ मोक्ष । अनुभव प्रत्यक्ष पहावा ॥ १७१ ॥
यासचि म्हणावें खरें स्मारक । जें संसृतितम तापहारक ॥
मोहमाया निरय तारक । शांतिदायक अक्षय्य ॥ १७२ ॥
ग्रंथकारराव गोविंद । साइसद्गुरु पदारविंद ॥
नित्य नवा मधु मकरंद । चाखित मिलिंद होऊनी ॥ १७३ ॥
उपनाम जयांचें दाभोळकर । आंग्लप्रभू सेवातत्पर ॥
विद्या, विनय, आचारविचार । अधिकारसंपन्न जे असती ॥ १७४ ॥
रखुमाबाई तयांची गृहिणी । सुशील भाविक सद्गुणखाणी ॥
पतिपरायण विनतवाणी । साईचरणीं दृढभाव ॥ १७५ ॥
वेंगुर्ल्या संन्निध " दापोली " । मूळवस्ती तेथ जाहली ॥
" केळवे " ग्रामीं नंतर केली । वस्ती वाडवडिलीं कर्त्यांच्या ॥१७६ ॥
शके सतराशें एक्यायशीं । शुक्ल पंचमी मृगशिर मासीं ॥
रघुनाथ भार्या लक्ष्मीच्या कुशीं । जन्मती पुण्यराशी गोविंद ॥ १७७ ॥
गौड सारस्वत ब्राह्मण जाती । गोत्र भारद्वाज वय सप्तती[1] ॥
आषाढ शुक्ल नवमी । दिवंगति[2] अठराशें एकावनीं ॥ १७८ ॥
शके अठराशें चवेचाळिसीं । ग्रंथ आरंभिला चैत्रमासीं ।
बावन्नाध्याय ज्येष्ठमासीं । शके एकावनीं पूर्ण केलें[3] ॥ १७९ ॥

---

१ सत्तर ( वय ७० वर्षांचें ); २ निधन, मृत्यु; ३ शकें अठराशें एकावन ज्येष्ठमासांत.

गोविंदरावा एकचि सुत । पांच दुहिता, चार विवाहित ।
सुत विवाहित वैद्यक शिकत । सुता अविवाहित शिके तेंची ॥ १८० ॥
आतां कथितों पारायण पद्धती । तैसीच सप्ताहाची सुगमरीती ।
दिधली गुरुचरित्रीं वा अन्य ग्रंथीं । कृपावधान श्रोतीं द्यावें ॥१८१॥
चोखट करूनी अंतःकरण । भक्तिभावें करावें पारायण ।
एक, द्वि, वा त्र्यहनिं करावें पूर्ण । साइ नारायण तोषेल ॥ १८२ ॥
अथवा करावा सप्ताह गोड । मिळेल पुण्य संपत्तीची जोड ।
साई पुरवील मनीचें कोड । भवभय मोड होईल ॥ १८३ ॥
प्रारंभ करावा गुरुवासरीं । उषःकालीं स्नानानंतरीं ।
बसावें आपुल्या आसनावरी । उरकुनी सत्वरी नित्यकर्म ॥ १८४ ॥
मंडप घालावा रम्य विस्तीर्ण । रंभा, कर्दळी, वसनादि करून ॥
उपरि सुंदर आच्छादन । घालून विभूषित करावा ॥ १८५ ॥
त्यांत करावें उच्चासन । भोंवतीं काढाव्या भिन्न भिन्न ॥
रंगवल्ल्या रंगपूर्ण । नयन सुभग असाव्या ॥१८६ ॥
साईसद्गुरु प्रतिमा करून । अथवा सुंदर छबी घेऊन ॥
उच्चासनीं ठेवावी जपून । करूनि वंदन प्रेमभावें ॥ १८७ ॥
चीनांशुकीं[1] ग्रंथ बांधोनी । सद्गुरु सन्निध त्या ठेवून ॥
पंचोपचारें उभयां पूजुनी । आरंभ वाचनीं करावा ॥ १८८ ॥
व्रतस्थ राहावें अष्ट वासर । करावा गोरस वा फलाहार ॥
अथवा भर्जित धान्य प्रकार । नक्त रुचिर वा एकभुक्त ॥ १८९ ॥
प्राची दिशीं मुख करून । सद्गुरुमूर्ती मनीं आठवून ॥
करावें स्वस्थ मनें करून । ग्रंथ वाचन मोदभरें ॥ १९० ॥

---

१ रेशमी.

अष्ट, अष्ट, आणि सप्त, । अष्ट, षट्, अष्ट, सप्त, ॥
एवं पाठ करावा दिन सप्त । अवतरणिका फक्त अष्टमाहनीं ॥१९१॥
अष्टमदिनीं व्रतपारणा । करूनि नैवेद्य साइनारायणा ॥
सुग्रास भोजन आप्तेष्ट, ब्राम्हणा । दक्षिणा यथाशक्ती त्या द्यावी॥१९२
अथवा तूनि वैदिक ब्राह्मणा । करावी निशीं वेदघोषणा ।
पय शर्करापान, संभावना । देऊन तन्मना निवत्रावें ॥ १९३ ॥
अंतीं वंदूनि सद्गुरुचरणा । अर्पावी त्या उचित दक्षिणा ।
धाडावी ती भांडारभुवना[1] । संस्थान निधि वर्धना कारणें ॥ १९४ ॥
येणें तोषेल साई भगवान । देईल भक्ता पसायदान ।
छेदिल भवभय लेलिहान[2] । दावील निधान मोक्षाचें ॥ १९५ ॥
श्रोते संत माहेरघर । पडो, पडेल अवतरणिका विसर ।
द्यावी ग्रंथार्थावर नजर । विनवी किंकर पायातें ॥ १९६ ॥
श्रोते सज्जन कृतांत काळ । असो दासावर दया अढळ ।
ठेवुनि तुमच्या चरणीं भाळ । मार्थी बाळ बाबांचा ॥ १९७ ॥
उणें अधिक असेल जें जें । तें तें द्यावें मजला माझें ।
सार घेऊनि चित्त विराजे । ऐसें कीजे श्रोतीं तुम्हीं ॥ १९८ ॥
नमो साई शिवनंदना । नमो साई कमलासना[3] ।
नमो साई मदुसूदना । पंचवदना[4] साई नमो ॥ १९९ ॥
नमो साई अत्रिनंदना[5] । नमो साई पाकशासना[6] ।
नमो साई निशारमणा[7] । वन्हि नारायणा साई नमो ॥ २०० ॥

---

१ शिरडी संस्थानच्या खजिनदाराच्या घरीं; २ साप; ३ ब्रह्मदेव;
४ शंकर; ५ दत्त; ६ इंद्र; ७ चंद्र.

नमो साई रुक्मिणीवरा । नमो साई चिद्भास्करा ।
नमो साई ज्ञानसागरा । ज्ञानेश्वरा श्री-साई नमो ॥ २०१ ॥
अवतरणिका वाक्पुष्पांजली । तैसीच नमन नामावली ।
प्रार्थी अर्पुनि गुरुपदकमलीं । साई माउली संतोषो ॥ २०२ ॥

इति श्रीसाईसद्गुरु प्रेरिते । दास बाबा बाळ विरचिते ।
श्री साई समर्थ सच्चरिते । अवतरणिका
नाम त्रिपंचाशत्तमोध्याय: संपूर्ण: ॥
॥ श्री साईनाथार्पणमस्तु ॥
॥ शुभं भवतु ॥

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन र्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. ो. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास ·॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावीं. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाई लीला**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ७ वें ]　　　　[ अंक ९-१०-११.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका:

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| स्फुट विषय ... ... ... ... | १०९-१२० |
| आत्म्याच्या सर्वसाक्षित्वाचा आणि सर्वसमर्थत्वाचा परोक्षानुभव. ... ... ... | १२१-१२२ |
| श्रीगुरुप्रसादोद्गार ... ... ... | १—८ |
| कै० श्री० अण्णा बाबरे चिंचणीकर यांच्या मिळकतीबद्दल पुढील हकीकत ... ... ... | १—६ |
| श्रीसमर्थ शिरडीचे साईबाबा ... ... | १—४ |
| श्री साईसच्चरित प्रस्तावना ... ... | १—१४ |
| अनुभव व विचार ... ... ... | १—१० |
| केकावलि ... ... ... ... | २२३ २४८ |
| शके १८५१ सालच्या पुण्यतिथीच्या जमाखर्चाचा हिशोब | १ १२ |
| भक्तमंडळीकडून आलेल्या वर्गणीची यादी ... | १३—१४ |


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत, **केकावली** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची " यशोदा पांडुरंगी " ही टीका श्री साई लीलेच्या ४--५ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

ही टीका सुमारें साठ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली होती, आणि आजमितीस हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला आहे. तरी ग्राहक याचा फायदा घेऊन ऋणी करतील अशी आशा आहे.

व्यवस्थापक—**श्रीसाई लीला**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड

—प्रकाशक

ह्या भक्तियोगाची अशी कांहीं विलक्षण मौज आहे कीं, तो आपल्या सुलभतेमुळेंच ह्या प्रायः रजप्रधान आणि तमप्रधान असलेल्या सृष्टीस अप्रिय वाटतो. ईश्वरास अप्रिय असलेला कोणताही विचार मनांत कधींच येऊं न देतां प्रत्येक कायिक, वाचिक, मानसिक कर्म ईश्वरास स्मरून यथाशक्ति केलें, म्हणजे भक्तियोग सफल होऊन सिद्धावस्था प्राप्त होते. गुण-दोष जे कांहीं आहेत ते मनांत असतात, कर्मामध्यें नाहींत. मन दूषित नसेल तर दुष्कर्म घडणें शक्यच नाहीं. जाग्रतावस्थेंत परस्त्रीकडे पाप बुद्धीनें नुसतें पाहिलें, तरी त्या मानसिक दोषानें महत्पाप घडतें; आणि गाढ झोंपेंत प्रसंग-वशात् तिच्या गुप्त अवयवावर प्रत्यक्ष हात जरी पडला, तरी त्यायोगें कांहीं एक पाप घडत नाहीं. एवढ्यासाठीं वासना शुद्ध ठेविली म्हणजे सर्व पापें दूर पळतात. ह्यामुळेंच श्री गोरोबा कुंभार, श्री रोहिदास चांभार, श्री चोखोबा महार, श्री सजन कसाई, वगैरे हीन यातीचे पुरुष परम पदास पावले. चित्त-शुद्धि स्वतःच्या मालकीची असते. ती कोणालाही आपल्यापासून हिरावून घेतां येत नाहीं. आणि ती असली म्हणजे कोणत्याही नामरूपात्मक दृश्य वस्तूची पर्वा करण्याचें कारण नाहीं. कोणी आपला द्वेष केल्यास, "**भांडणाचें तोंड काळें,** " असें समजून आपण त्याची उपेक्षा करावी. अर्थात् "**दुर्जनं प्रथमं वंदे,**" या न्यायानें त्याच्या-पासून चार पाऊलें दूर राहावें. त्याचा द्वेष मात्र करूं नये. कारण आपल्याला त्याच्यापेक्षां श्रेष्ठ व्हावयाचें आहे. त्याची बरोबरी करुन आपली अवनति करून घ्यावयाची नाहीं. दयेस पात्र असलेल्या जिवावर यथाशक्ति दया करावी. कारण दया म्हणजे करुणा, हा ईश्वरी गुण आहे. ह्याचसाठीं श्री तुळसीदासांनीं "**दया धरमका मूल है**" असें म्हटलें आहे. अहंभावीं म्हणजे अभिमान हा धरिला कीं, सर्व पातकें गळ्यांत मिठ्या मारूं लागतात. ह्या-साठींच श्रीतुळशीदासांनीं '**पापमूल अभिमान**' असें म्हटलें आहे. सर्व जग-भर जे कांटे पसरले आहेत ते सारे कोणालाही नाहींसे करतां येणें शक्य नाही. ह्यास्तव आपण आपल्या पायांत जोडा घालावा, म्हणजे आपलें काम भागतें.

जगांत ज्याला मित्र मिळणार नाहीं असा हतभागी माणूस मिळणारच नाहीं मग शुद्ध चित्त पुरुषाला मित्रांची वाण कशी पडणार ? " चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती। व्याघ्र न खाती सर्प तया ॥ " असा आम्हांला प्रत्यक्षानुभव अण्णासाहेब पटवर्धनांच्या घरीं आणि इतरत्र आलेला आहे. भक्तांनीं मैत्री वाढवून एकमेकांना सहाय्य करावें. आणि जे पुरुष उपेक्ष्य नसतील त्यांच्या सहाय्यानें आपला काळ आनंदांत घालवावा. आनंद म्हणजे **मुदिता**, दया म्हणजे **करुणा**, प्रेम म्हणजे **मैत्री** आणि उदासीनता म्हणजे **उपेक्षा** ह्या चारी वासना शुभ आहेत, व त्याच चित्तशुद्धिदर्शक आहेत. त्या कधींही फार वेळ गुप्त राहात नाहींत, आणि त्या दृग्गोचर होऊं लागल्या म्हणजे सहजच इतरांना चित्ताकर्षक होतात. ह्या वासनांच्यामध्यें विलक्षण वशीकरण शक्ति असते, त्यामुळें त्यांच्या स्वामीवर जग मोहून पडतें. साधकांच्या ह्या मोहनास्त्रानें जग वेडावून जातें. ज्या गोष्टींवांचून साधकाचें आत्मोन्नतीचें काम नडतें, त्या त्याच्या स्वाधीन असतात, आणि ज्यावांचून तें नडत नाहीं, त्याची तो पर्वा करीत नाहीं. परंतु आपल्याला शहाणे समजणारे सुशिक्षित समाजाग्रणी लोकच अविचारानें स्वार्थसाधु, पक्षपाती बनून शुभवासनांचा त्याग करूं लागले, म्हणजे त्यांच्या शासनार्थ देव त्यांचेच दांत त्यांच्या घशांत घालण्याची योजना करितो. ते रावणासारखे देवांना आपले कैदी करून ठेवूं लागले, म्हणजे ज्या लोकांना वास्तविक त्या देवांची फारशी पर्वा नसते तेच लोक त्यांची मुक्तता करण्याचा सत्याग्रह जारीनें करूं लागतात. पंचमहाभूतांवर देवाशिवाय कोणाचीच पूर्ण मालकी नाहीं. पण शहाणे लोकच त्यांच्यावर सर्वस्वी आपली मालकी आहे असें म्हणूं लागले कीं, देव इतरांना जागें करून पंचमहाभूतांवर त्यांचीही मालकी असल्याची त्यांना जाणीव उत्पन्न करतो, व समाजांत तंटेबखेडे माजवितो. सारांश, " **गुरुची विद्या गुरूला फळली** " असा प्रकार करून परमेश्वर अन्यायाचा प्रतिकार करवीत असतो. हा ईश्वराचा राजमार्ग ओळखून आतां तरी प्रथमतः विद्याधनसंपन्नांनीं शहाणें व्हावें; नाहीं तर अखेरीस यादवी माजून सर्वांचाच संहार होईल.

अंतःकरणामध्यें सद्भक्तिभाव उत्पन्न होणें फार दुर्लभ आहे, असें जें ह्या सूत्रांत सांगितलें आहे, त्याच्यामुळें कोणासही हताश होण्याचें कारण नाहीं. वर्णसंकरामुळें " **जन्मना जायते शूद्रः** " ह्या देवलस्मृत्यन्वयें सकल आर्यांना ह्या युगांत जरी स्वभावतःच शूद्रत्व प्राप्त होत असलें, तरी सामान्य धर्माचें यथोचित परिपालन करून स्वकर्मार्पणद्वारें ईश्वराचें अभ्यर्चन केल्यास त्याच्या प्रसादानें सिद्धावस्था प्राप्त होते, असें जें भगवद्वचन आहे (भ. गी. १८ ४५, ४६ ) त्याच्यावर श्रद्धा ठेवून आपल्या कार्यास लागणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे; आणि तें दुःसाध्यही नाहीं. भगवान् मनूनें जे सामान्य धर्म सांगितले आहेत, ते पुढील श्लोकांत ग्रथित केले आहेत, आणि ते उत्कृष्ट नीतिपर असल्यामुळें सर्वमान्यही आहेतचः--

अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः ॥
एतं सामासिकं धर्मं चातुर्वर्ण्येऽब्रवीन्मनुः ॥ १०--६३ ॥

पुढें अठ्ठ्याहत्तराव्या सूत्रांत **अहिंसा, सत्य** आणि **शौच** ह्या शब्दांच्या अर्थांचें स्पष्टीकरण होईल त्यावरून **इंद्रियनिग्रह** म्हणजे **अंतःशौच** होय, असें दिसून येईल आणि **अस्तेय** ह्याचा अर्थ दुसऱ्याच्या मालकीच्या वस्तूचा अभिलाष न करणें असा आहे; व त्याचा त्या सूत्रांतील **दया** ह्या शब्दांत अंतर्भाव होतो.

## सूत्र ५४ गुणरहितं कामनारहितं प्रतीक्षणवर्धमानमविच्छिन्नं सूक्ष्मतरमनुभवरूपम् ॥

**आर्या** निर्गुण निर्वासन जी, प्रतिक्षणीं वाढते सदा प्रीती ।
तत्सूक्ष्मानुभवाचा, **साई** आस्वाद घेइ सतत पुरा ॥

---

**विवरणः**—सत्तेचाळिसाव्या सूत्रांत **गुणातीतता** हें साधकाचें साध्य होय, असें जें म्हटलें आहे, तीच गुणातीतता सिद्धाचें स्वरूप होय, असें ह्या सूत्रांत प्रथमतः सांगितलें आहे. त्याचप्रमाणें सातव्या सूत्रांतील कामनाराहित्यही सिद्धाचें स्वरूपलक्षण असतें, असें ह्या सूत्रांत त्याच्या पुढें

पुन: म्हटलें आहे. त्यानंतर अद्वैती भक्ताच्या अंत:करणांत जीवेशैक्योद्भूत स्वात्मप्रेमरूप परेशप्रेमाशिवाय कोणत्याही इतर भावनेस थारा नसल्यामुळें त्याची भक्ति अभ्यासबलानें सहजरीत्या सतत वाढत जाऊन तिच्यांत कधींच खळ पडत नाहीं, असें पुढें म्हटलें आहे. आणि शेवटीं सूत्र एकावनमध्यें सांगितल्याप्रमाणें खरी भक्ति ही अतिसूक्ष्मत्वास्तव अनिर्वचनीय असल्यामुळें फक्त अनुभवगम्य मात्र असते, असें म्हटलें आहे.

**सूत्र ५५. तत्प्राप्य तदेवावलोकयति, तदेव शृणोति, तदेव चिंतयति ॥**

**आर्या:—** ईशकृपें सर्वात्मक, भक्ति जयां प्राप्त होय त्यां संतां ।
**सांई**शप्रेमाविण, अंतर्बाह्येंद्रियीं नसे कांहीं ॥

---

**विवरण:—**मागें पांचव्या सूत्रांत व्रजगोपिकांसम असलेल्या प्राप्त पुरुषांचें जें वर्णन केलें आहे, त्याचाच येथें विस्तार करून असे प्राप्त पुरुष फक्त परेशप्रेमांत रंगून गेल्यावर कोणकोणत्या प्रकारें कालक्रमणा करितात, तें सांगितलें आहे. (भ. गी. ९–१३, १४) ऐकांतिक सख्य-भक्तांचा सर्व देहेंद्रियमनप्राणव्यापार केवळ सखैकपर असतो, असें ह्या सूत्राचें तात्पर्य आहे.

ज्ञानयोग ( सांख्ययोग ), चित्तवृत्तिनिरोधकारक पातंजलयोग ( हठयोग ), आणि श्रुतिस्मृतिपुराणोक्त सत्कर्मयोग, ह्या योगत्रयांत नसलेला, असा जो भक्तियोगाचा **विशेष** ( भ. गी. ५--२ ) आहे, तो असा आहे कीं, भक्तियोगांत उपास्यउपासकरूपीं द्वैत-भावाचा **विनाश** न होतां शुद्ध उपास्यमयतेंतील अद्वैतानंदाचा उपभोग सतत होत असतो. श्रीतुकाराम महाराजांनी "**अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान,**" असें जें म्हटलें आहे, त्यांतील इंगित हेंच आहे.

**सूत्र ५६. गौणी त्रिधा, गुणभेदादार्तादि भेदाद्वा ॥**

**आर्या:—** त्रिगुणात्मक काम्यद्वि वा, त्रिविधा असतेच भक्ति ती गौणी ।
परि ऐकांतिक साऱ्या, ह्यास्तव भक्ता उदार **सांई** म्हणे ॥

**विवरण**:—भक्तीच्या गौण प्रकारांचें प्रस्तुत सूत्रांत व पुढील सूत्रांत त्रोटक वर्णन केलें आहे. सत्व, रज आणि तम ह्या गुणत्रयामुळें अथवा आर्तता, जिज्ञासा आणि अर्थेच्छा ह्या वासनात्रयामुळें भक्तीचे तीन प्रकार होतात, इतकेंच ह्या सूत्रांत सांगितलें आहे, आणि त्या त्रिप्रकारांचा तरतम-भाव कसा आहे, तो पुढील सूत्रांत सांगितला आहे. गुणत्रयामुळें होणारे भेद वासनात्रयामुळें होणाऱ्या भेदांहून भिन्न मानिले, तर भक्ति षड्विध होऊन सूत्रस्थ " **त्रिधा** " ह्या शब्दाला बाध येईल. शिवाय तें दोन प्रकारानें होणारें भेदत्रय समान नसलें, तर सूत्रांतीं असलेला " **वा** " शब्द अनुचित ठरेल. ह्यास्तव आर्तांची भक्ति सात्विक, जिज्ञासूची राजस आणि अर्थार्थ्यांची तामस होय, असें समजणेंच उचित म्हणावें लागतें. कारण सूत्रस्थ '**आर्तादि**' ह्या शब्दावरूनच त्या वासनात्रयाचा सत्वादि गुणत्रयाशीं अनुक्रमें संबंध आहे असें प्रस्थापित होतें.

**सूत्र ५७. उत्तरस्मादुत्तरस्मात्पूर्वपूर्वा श्रेयाय भवति ॥**

**आर्या:—** आर्तांची ती सात्विक, जिज्ञासूची रजोगुणी भक्ती ।
अर्थार्थ्यांची तामस, गौण्यानुक्रम असा वदे **सांई** ॥

**विवरण:**—मागील सूत्रांत सांगितलेले गौणी भक्तीचे गुणभेदादि प्रकार आणि आर्तादि प्रकार ह्या दोहोंनाही हें सूत्र सारखेंच लागू असल्यामुळें ते द्विविधा प्रकार एकात्मक आहेत असेंच ठरतें. प्रस्तुत सूत्राप्रमाणें आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्थी ह्यांच्यांतील तरतमभाव अनुक्रमें सत्व, रज आणि तम यांच्या तरतम भावासारखा आहे, असाच अर्थ निष्पन्न होतो. ह्या सर्व प्रमाणां-वरून गौणी भक्तीविषयींच्या ह्या दोन्हीं सूत्रांचा अर्थ आम्हीं केला आहे ह्याहून भिन्न असणें शक्य नाहीं, असें दिसून येईल. असो.

प्रारब्धवशात् स्वर्गभोगप्राप्त्यर्थ ईशभक्ति करणें हा गौणीभक्तीचा सात्त्विक प्रकार आहे. त्याचप्रमाणें ती ऐहिक ऐश्वर्यप्राप्त्यर्थ करणें, हा तिचा राजस प्रकार आहे, आणि ईश्वराशीं अखंड वैरभाव धरणें, हा तिचा तामसी प्रकार आहे. अशा स्वभावजभिन्नगुणानुसार भिन्न प्रकारें केलेल्या गौणी भक्तीचीं उदाहरणें पुराणांत अनेक आहेत. प्रारब्धबलानें स्वभावज-गुणानुसार घडणाऱ्या अशा गौणी भक्तीनें मोक्षप्राप्ति दुरावते. कारण जशी भक्ताची इच्छा असेल तसेंच ईश्वर त्याला फल देतो ( भ. गी. ४–११ ) हा गुणभेदान्वयें घडणाऱ्या गौणी भक्तीचा विचार झाला. आतां आर्तादि भेदानें ( भ. गी. ७–१६ ) केलेल्या गौणी भक्तीचा विचार करूं. आर्ताच्या भक्तीचा वेग सहज फार तीव्र असतो. ह्यास्तव तिला ह्या प्रकारत्रयांत सत्त्वगुणासम आद्यस्थान दिलें आहे. गजेंद्रमोक्ष हें ह्या आर्तभक्तीचें उदाहरण आहे. आर्ताच्यापेक्षां जिज्ञासूच्या भक्तीचा वेग कमी तीव्र असतो. ह्यास्तव त्याच्या भक्तीला रजोगुणात्मक भक्तीसारखेंच मध्यस्थान दिलें आहे. ह्या जिज्ञासुभक्तीचें उदाहरण महाराजा परीक्षिताचें आहे. आणि अर्थार्थ्याची भक्ति मंद असते, म्हणून तिला तमोगुणी भक्तीप्रमाणें अंत्यस्थान दिलें आहे. ध्रुव, उपमन्यु हे अर्थार्थी भक्त होते, ही गोष्ट पुराणप्रसिद्ध आहे.

आर्तादि शब्दांचा अर्थ गीतेच्या शांकरभाष्यांत साधकांच्या दृष्टीनें केला असून श्रीनाथभागवतांत सिद्धांच्या दृष्टीनें केला आहे, म्हणून ते आपापल्या दृष्टीनें योग्यच आहेत. त्यांत तरतमभाव मानण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं. शिवाय ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायांतील एकशेंआठव्या ओंवीमधील " **जिहीं आत्महित केलें। वाढतें गा ॥** " ह्या शब्दांचा क्रम बदलून " वाढतें आत्महित " असें वाचण्यापेक्षां **आत्महित केलें वाढतें** " असा मूळचाच शब्दक्रम कायम ठेविला, म्हणजे " **आत्महित वाढीस लावलें** " असा अर्थ होऊन " **उदाराः सर्व एवैते** " ( भ. गी. ७–१८ ) ह्या भगवदुक्तीशींही तो छत्तीस गुण मिळून संलग्न होतो; अन्यथा होत नाहीं. शिवाय चतुर्विध भक्तांतील पहिल्या तीन प्रकारच्या भक्तांपासून ज्ञानी भक्तास भगवंतांनींच

" **ज्ञानी त्वात्मैव मे मतम्** " ( भ. गी. ७-१८ ) असें म्हणून विभक्त केला आहे; मग त्याच्या अनुरोधानें पूर्वीच्या त्रिविध भक्तांचा क्रम ठावण्यांत अर्थ काय ? अठराव्या अध्यायांतील चौपन्नाव्या श्लोकाच्या व्याख्यानांत श्रीज्ञानेश्वरांनीं फक्त " **येर आर्त जिज्ञासु अर्थार्थी । हे भजती जिये पंथीं ॥ ते तिन्ही पावोनि चौथी ॥ म्हणिपत आहे ॥ ११११२ ॥** " इतकेंच ह्या विषयीं म्हटलें आहे. तेव्हां त्यावरूनही प्रस्तुत सूत्राविरुद्ध क्रम सांगण्याचा त्यांचा हेतु यत्किंचितही व्यक्त होत नाहीं. शिवाय ह्या चतुर्विध भक्तांचा क्रम सांगावयाचा जर भगवंताचा हेतु असता व तो जर श्रीव्यासांना कळला असता, तर त्यांनीं शास्त्रनियमानुसार ज्ञानी भक्तास खचितच आद्य स्थान दिलें असतें. त्याला असा शेवटीं खास ढकलून दिला नसता. भीमार्जुन, कृष्णार्जुन, रामकृष्ण इत्यादि द्वंद्वसमासांत जो क्रम आहे, तो शास्त्रसिद्ध आहे. यादृष्टीनेंही नारदांचा क्रमच यथार्थ ठरतो. ह्याचाच आणखी दुसऱ्या दृष्टीनें विचार करूं. ईश्वरप्राप्ति हाच श्रेष्ठ अर्थ आहे, अशी भावना असलेला **अर्थार्थी** निदान परोक्षज्ञानी मुमुक्षु तरी असलाच पाहिजे. नाहीं तर ज्या वस्तूचें परोक्षज्ञानही नाहीं तिला सर्वश्रेष्ठ साध्य समजेल कोण ? परोक्षज्ञानी जो असेल त्यालाच मगपुढच्या अपरोक्ष ज्ञानाची **जिज्ञासा** होईल. इतरांस होणार नाहीं. व अशी ही जिज्ञासा अति तीव्र झाल्यानंतरच नाथांनी वर्णिलेली **आर्तता** उत्पन्न होणें शक्य आहे. आणि प्रस्तुत सूत्रोक्त तरतमभाव ह्या विचाराशीं तंतोतंत जुळतो. नाथ भागवताच्या एकोणिसाव्या अध्यायांतील चोविसाव्या श्लोकाच्या टीकेंत चतुर्विध भक्तांचें जें वर्णन केलें आहे, त्यांत त्यांनीं त्यांचा तरतमभाव श्री नारदांप्रमाणें स्पष्ट रीतीनें व्यक्त केलेला नाहीं; पांडित्याभिमान सोडून वितंडवाद करीत बसण्याच्या भरीस न पडतां श्रद्धायुक्त मनानें आणि गाडीच्या मागें बैल जुंपण्याइतके नाथ खचित् वेडे नव्हते. सद्बुद्धिपूर्वक ह्या विषयाचा विचार केला तर श्री नारद, श्री शंकराचार्य, श्री ज्ञानेश्वर आणि श्री एकनाथ ह्यांची एकवाक्यता समजून येण्याचें काम फार कठीण पडणार नाहीं. बाकी श्री नारद आणि श्री शंकराचार्य ह्यांच्याशीं श्री एकनाथांचा जर कोठें विरोध असलाच तर " **बीचमें मेरा चांद-**

भाई " अशा प्रकारचा दुरभिमान न धरितां आम्हीं नाथांच्या मताचा प्रमाणपूर्वक अव्हेर करूं. कारण " आचार्यांतें वाट पुसत " जाणाऱ्या श्री ज्ञानेश्वरांचे भक्त ह्या नात्यानें नाथ हे आचार्यानुयायीच आहेत.

पंडितांनीं आपल्या गीतेच्या समश्लोकींतील नवमाध्ययाच्या अवतरणापैकी श्लोक एकसष्ट ते सत्तर ह्यामध्यें जो दुरभिमानमूलक संतनिंदात्मक नाटकी विनय दाखविला आहे, तसा विनय पंडितंमन्यांनाच शोभतो; आणि तो त्यांनाच लखलाभ असो.

**सूत्र ५८** **अन्यस्मात्सौलभ्यं भक्तौ ॥**

**आर्या** पंचविसाव्या सूत्रीं, दिधलें श्रेष्ठत्व भक्तियोगातें ।
त्यातें सौलभ्य म्हणें, ह्या सूत्रामाजि मच्छवा **सांई** ॥

---

**विवरणः**—मागील दोन सूत्रांत गौणी भक्तीचा विचार झाला. आता पुनः श्रेष्ठ भक्तीची स्तुति करीत आहेत. सूत्रें पंचविस ते सत्तावीस ह्यामध्ये सकल मोक्ष साधनमार्गांत भक्तियोग श्रेष्ठ आहे, असें जें सांगितलें त्याचें कारण भक्तियोगाची सुलभता हेंच होय, असें ह्या सूत्रांत सांगितलें आहे.

भक्तियोग सुलभ आहे, हें खरें आहे; पण तो कोणाला सुलभ आहे ! ज्याची पूर्णवैराग्यपूर्वक व्यवसायात्मिका म्हणजे केवळ ईशपर बुद्धि झाली ( भ. गी. २-४१ व ४५ ) त्याला मात्र तो सुलभ आहे. तेरड्याप्रमाणें नित्य रंग बदलणाऱ्या, असत्यप्रिय, सुसंगतानिंदक ( तिला Virtue of the ass म्हणणारा ) राजकारणी ढोंगी पुराणिकाला तो कधींही प्राप्त व्हावयाचा नाहीं. त्याचीं सारीं " **पुराणांतलीं वांगीं पुराणांतच** " राहाणार. मग भक्त्यभावीं त्याला खरी ज्ञानप्राप्ति व्हावीं कशी ? आणि ज्ञानाभावीं त्याची सारी बडबड " **बोलाचीच कढी बोलाचाचि भात** " अशी निष्फळच होणार.

सूत्र ५९ **प्रमाणान्तरस्यानपेक्षत्वात्स्वयंप्रमाणत्वात् ॥**

**आर्या** सौलभ्य भक्तियोगीं, एतद्विषयीं प्रमाण अन्य नको ।
स्वयमेव भक्त असती, प्रमाण **सांई** न तेथ दे शंका ॥

**विवरण:**—त्रैलोक्यगुरु जगदीश भगवान श्रीकृष्णप्रोक्त गुह्यतम शास्त्रावर ( भ. गी. १५–२० ) श्रद्धा ठेवून केवळ एकांतिक भक्तीशिवाय इतर सर्व धर्मांचा त्याग करावा ( भ. गी. १८-६६ ); आणि अनन्यगतिक बुद्धीनें त्या परमात्म्याला म्हणजे त्याच्याशीं एकात्मता पावलेल्या एखाद्या महात्म्याला एकनिष्ठेनें शरण जावें, म्हणजे त्याच्या प्रसादानें साधक यथावकाश जीवन्मुक्त होतो, असा अखिल गीताशास्त्राचा उपसंहार केलेला आहे, त्यावरून भक्तियोग हाच मुक्तीचें अतिसुलभ साधन होय, असें सिद्ध होतें. आणि त्या मार्गाचा अवलंब करणाऱ्या सकल संतांचा स्वानुभवही असाच आहे, इतका ह्या सूत्राचा स्पष्टार्थ आहे. अंधश्रद्धेनें जरी अशी एकनिष्ठ शरणागति झाली, तरी ती संवादिभ्रमरूपी असल्यामुळें अंतीं मोक्षदायकच होते.

सूत्र ६० **शांतिरूपात्परमानंदरूपाच्च ॥**

**आर्या** तेवींच भक्ति आहे, सुशांतिमयही असाचि अनुभव ये ।
आणिक परमानंदहि, ती देते दावितो असें सांई ॥

**विवरण:**—अखंड अंत:शांतिमय निजानंद मूर्तीच्या सत्संगाचा लाभ होऊन नंतर यथाकाल सर्व संशयनिवृत्तिद्वारें तिच्या खऱ्या स्वरूपाचा अनुभव आल्यावर तिच्याच प्रसादानें जी भक्तिज्ञानवैराग्योद्भूत चित्तशांति मिळते ती अति दुर्लभ असून सर्वस्वी अवर्णनीय आहे. नुसत्या तर्कानें त्या शांतीची वास्तविक कल्पनाही करण्यास मानवीबुद्धि असमर्थ आहे ( भ. गी. ३-४२ ) मग तिचें वर्णन वाणीनें कसें होणार ? अखंड अंत:शांतिसुखाच्या अशा अवर्णनीयत्वामुळेंच " **जिन्ने कमाया उन्ने छपाया** " असा प्रकार

होतो, त्याला उपाय नाहीं. प्रथम संतकृपेची पात्रता संपादन करून नंतर तिचा लाभ झाला, म्हणजे त्या शांतिसुखाचा अनुभव येतो. अननुभवी जिवांना तिची महति समजण्यास मार्गच नाहीं. खरी शांति निवृत्तींत आहे, प्रवृत्तींत नाहीं,ह्याचा अनुभव जीवांना यावा एतदर्थ परम दयाघन परमेश्वरानें निवृत्तिमय शांतिरूप निद्रावस्था उत्पन्न केली आहे. तिचा विघात झाला तर जीवही नकोसा होतो, ह्यावरूनच तिच्या महत्तम् शांतिसुखदायकतेची उत्तम साक्ष पटते. पण सहजावस्था असल्यामुळें तिच्यांतील शांतीची महति नकळून लोक निवृत्ति-सुखांशदायक प्रवृत्तींतच दंग असतात, आणि तिच्यांतच धन्यता मानितात ! याहून अधिक अज्ञान कोणतें ? प्रत्येक जिवाच्या नित्य बोकांडीं बसणारा ह्या मायेचा ( अज्ञानाचा ) दुस्तर पगडा पाहूनच भगवंतांनीं "**मम माया दुरत्यया**" ( भ. गी. ७-१४ ) ह्या उक्तीनें निवृत्तिरूप शांतिसुखविघातक प्रवृत्तिरूप अज्ञानमय मायेची निर्भर्त्सना केली असून, त्या मायेच्या तडाक्यांतून सुटण्याचा श्रद्धायुक्त भगवदेक शरणतेचा मार्गही दाखविला आहे. पण भग-वद्वचनावर खरी श्रद्धा असण्याइतके भाग्यवान जीव ह्या जगांत क्वचितच असतात; व हा देखील अज्ञानस्वरूप मायेचाच खेळ आहे !

वास्तविक पाहातां शाश्वत परमशांतिदायक ज्ञानासारखें दुसरें ह्या जगांत कांहींच पवित्र नाहीं. ( भ. गी. ४--३८,३९ ) ह्या भगवद्वच-नावर श्रद्धा ठेवून सकल विद्यांमध्यें श्रेष्ठ अशी जी अध्यात्मविद्या ( भ. गी. १०--३२ ) तिच्याद्वारें क्षेत्र--क्षेत्रज्ञज्ञानयोगें ( भ. गी. १३--२ ) आपण प्रथमतः यथाशास्त्र ( भ. गी. ४--१; १६--२४ ) म्हणजे मनुस्मृत्युक्त मार्गानें स्वतः मुक्तिलाभ करून घ्यावा; आणि नंतर इतरांना यथाधिकार मोक्षमार्गोपदेश करावा, ह्यांतच मानवदेहप्राप्तीची इतिकर्तव्यता आहे, हें परमेश्वराचें हृद्गत जाणून सर्व महात्म्यांनीं सृष्टीच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत आचरण केलें आहे. ह्यालाच सदाचार म्हणतात; आणि "**आचार प्रथमो धर्मः**" ( श्रुतिस्मृतिपुराणांचें सार आचार बोलती । आचार पहिला धर्म, धर्माचा प्रभु अच्युत ॥ परशुरामपंत तात्या गोडबोलेकृत **नामार्थदीपिका** ) ह्या व्यासवाणीप्रमाणें अशा सत्कर्ममय सदाचारालाच **आद्यधर्म** म्हणजे

सद्धर्म म्हणतां येतें. अर्थात् इतर सारे धर्म मिथ्या प्रकृतिनिर्मित असत्कर्ममूलक ( विकर्ममूलक ) असदाचाररूपी असल्याकारणानें ते **असद्धर्मच** होत. असे असद्धर्म अतिशय बळावून सद्धर्माला ग्लानी येऊं लागली, म्हणजे परमात्मा अवतार घेऊन दुष्टसंहारद्वारें साधूंचें संरक्षण करितो, आणि धर्मसंस्थापनाही करितो ( भ. गी. ४-७ ते ९ ). परंतु आतां ह्यापुढें भगवंताच्या पाठीमागची ती अवतार घेण्याची दगदग कायमचीच चुकली आहे, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. कारण भगवंतावर श्रद्धा असून स्वसंरक्षणार्थ सर्वस्वीं त्याच्यावरच अवलंबून असलेल्या साधूंना आपत्तिनिवारणार्थ त्याच्या अवताराची तीव्र इच्छा होणार; आणि अशा आर्त भक्तांची इच्छा पूर्ण करण्याकरितां भगवंत अवतार घेणार, ही कार्यकारणपरंपराच आतां मनुष्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें जगांतून हद्दपार केली आहे. इतकेंच नव्हे, परंतु आम्हीं सर्वस्वी परतंत्र आहोंत असा सर्वांना नित्य सर्वत्र अनुभव येत असल्यामुळें, आम्हीं पूर्ण स्वातंत्र्याच्या कल्पनेला सुळावर चढवून परमेश्वरालाही मानवावलंबी बनविला आहे. त्याला जगाची सुस्थिति फक्त आमच्या मार्फतच ठेवितां येतें, नाहीं तर तें कार्य त्याला करितां येणार नाहीं, एवढ्यासाठीं तें आम्हींच केलें पाहिजे असे आतां आम्हीं सिद्धांत ठरविले आहेत, व ते सर्वमान्यही झाले आहेत. मग आमचे प्रत्यक्ष भूदेवच जर जगाची सुस्थिति राखण्याचें काम आपल्या अनुयायांकडून करवून घेण्यास समर्थ आहेत, तर त्या बिचाऱ्या काल्पनिक परमेश्वराची उगीच मध्यें लुडबुड पाहिजे कशाला ? असे ठराव आतां आम्हीं पास केले आहेत, हें पाहिल्यावर परमेश्वराला खरोखर बहुत आनंद झाला असेल ! कारण मूल चालूं लागलें म्हणजे जशी त्याला कडेवर घेण्याची दगदग चुकते, त्याप्रमाणें आम्हीं परमेश्वराचा अधिकार स्वसंपादित करून त्याला मोकळा केला आहे, हें सारें भविष्य परमेश्वराला पूर्वींच ठाऊक होतें असें वाटतें; आणि त्याच कारणास्तव आतां ह्या पुढें फक्त जगाच्या संहारकालीं मात्र एकदां कलंकी अवतार घ्यावयाचा, असें त्यानें अगाऊ ठरविलें असावें ! सत्कर्ममय सदाचाररूप सद्धर्माच्याद्वारें सर्व मानवसृष्टि मुक्त झाल्यास ह्या नामरूपात्मक मिथ्या जगदाभासाचा जो विनाश होईल, तो मुळींच न होऊं देण्याची ही किती

अगाध शक्ति परमेश्वरानें आपल्या मायेच्या ठिकाणीं ठेविली आहे ! ह्या जगामध्यें असत्कर्ममय ( विकर्ममय ), असदाचाररूप ( मिथ्याचाररूप ), असद्धर्माची ( आधिभौतिक धर्माची ) प्रवृत्ति अखंड सुरू ठेवण्याचीं मायाशक्ति जितकी प्रबळ आहे त्यापेक्षां तिचें सामर्थ्य जर कमी असतें, तर कर्माकर्मविकर्मांचा सक्गोलंकार करणारें कर्मयोग शास्त्रीवीर नष्ट होऊन ह्या पृथ्वीचाही स्वर्ग बनला असता.

# श्री सांईनाथ प्रसन्न.

रा. रा. सांईलीलाकर्ते यांस; स्नेहांकित नीलकंठ रामचंद्र ऊर्फ बाबा सहस्रबुद्धे मु. डेक्कन जिमखाना, पुणे नंबर ४, यांचा कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. वि. वि.

ता. २५।१०।२८ पावेतों सुखरूप असों, विशेष. श्री सद्गुरुकृपेनें आत्म्याच्या सर्वसाक्षित्वाचा आणि सर्वसमर्थत्वाचा परोक्षानुभव आल्याचीं कांहीं उदाहरणें आपणांकडे प्रसिद्ध्यर्थ पाठवीत आहे, त्यांचा स्वीकार व्हावा.

( १ ) आपली एका विशिष्ट गांवीं बदली झाली, असें आमचे मित्र कै. वा. शंकर श्रीपत देशपांडे यांना एके दिवशीं पहाटेस स्वप्न पडून, तें खरें ठरण्याची शक्यता वाटत नसतांही त्याच दिवशीं पहिल्या टपालानें तशी बदली झाल्याचा हुकूम त्यांच्या हातीं येऊन पडला; ही हकीकत त्यांनीं सुमारें इ. स. १८८४ सालीं सांगितली होती. परंतु हें कोडें आजपर्यंत आम्हांला उलगडलें नव्हतें.

( २ ) त्यानंतर सुमारें इ. स. १८९८।९९ सालीं आम्हांला महाबळेश्वराहून पुण्यास परत बोलाविलें आहे, असें एके दिवशीं पहाटेस आमचे मित्र कै. वा. भास्कर रामचंद्र दुगल ह्यांना स्वप्न पडून तें त्यांनीं निजून उठल्यावर जेव्हां आम्हास सांगितलें, तेव्हां तसें होणें शक्य नाहीं, असें वाटत असतांही कचेरींत गेल्यावर तें खरें ठरल्याचा अनुभव आला. ह्या कोड्याचाही आजपर्यंत उलगडा झाला नव्हता.

( ३ ) आज सकाळीं आमचे मित्र श्री. केशव रामचंद्र ऊर्फ बाबा जोगळेकर ह्यांचे जेष्ठ चिरंजीव श्री: नरहर केशव ऊर्फ दादासाहेब ह्यांना कांहीं जरूरीच्या कामानिमित्त भेटावयास गेलों असतां गाडींतून उतरतांना पाहताक्षणींच दादासाहेब खालीं आले, व प्रेमादरपूर्वक शिरसावंदन करून असें म्हणाले कीं, त्यांनीं आपल्या हक्काच्या एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअरच्या

जागेसाठीं सरकारशीं जो निकराचा वाद चालविला होता, त्यांत त्यांना यश-प्राप्ति झाल्याचा हुकूम ज्या दिवशा त्यांच्याकडे येऊन दाखल झाला, त्याच दिवशी निजून उठण्याच्यापूर्वी पहांटेस स्वप्नामध्यें आम्हीं त्यांच्या धैर्याबद्दल त्यांची पाठ थोपटून त्यांच्या यश:प्राप्तिबद्दल त्यांचें प्रेमपूर्वक अभिनंदन केलें होतें.

ह्या तिन्ही गोष्टींचें मनन करूं लागल्यावर सद्गुरुकृपेनें जो आज बोध झाला तो असा आहे:—

( १ ) रा. देशपांडे ह्यांच्या बदलीची हकीकत त्यांच्या हृदयस्थानें आपल्या मनास स्वप्नावस्थेंत कळवून तिचा जागृतावस्थेंत त्याला प्रत्यक्षानुभव आणून दिला.

( २ ) आमच्या हृदयस्थानें स्थलांतराची हकीकत आमच्या मनास स्वप्नावस्थेंत कळवून नंतर तिच्या सत्यतेचा जागृतावस्थेंत अनुभव घेतला.

( ३ ) आमच्या हृदयस्थानें श्रीयुत जोगळेकर ह्यांच्या यश:प्राप्तीची हकीकत त्यांच्या मनास स्वप्नावस्थेंत कळवून नंतर त्यांच्या मार्फत ती स्वत: आपणास निवेदन करवून घेतली.

ह्या परोक्षानुभवामुळें जो आनंद झाला त्यावरून श्रीसाईनाथांनीं मजविषयीं "**तो माझाच आहे; त्याला ( भवसागराच्या ) पलीकडे नेण्याचें काम मलाच केलें पाहिजे; माझ्याशिवाय त्याला कोण आहे ?**" असे जे उद्गार काढिले होते, त्याची प्रत्यक्षता झाली आहे.

अशा प्रकारें भूतभविष्यज्ञान श्रीसाईनाथ जागृतावस्थेंत अनेकदा व्यक्त करीत असत, त्यावरून त्यांच्या अपरोक्षज्ञानाबद्दल माझी पक्की खात्री झालेली असून तशा ज्ञानाचा मला त्यांच्या कृपेनें लाभ व्हावा अशी त्यांच्या चरणीं अखंड प्रार्थना करीत आहे. कळावें, लोभ असावा, ही विनंति.

# गुरुप्रसादोद्गार

## ॥ हरिः ॐ ॥

# कर्मसंन्यास रहस्य

( साकी )

प्रारब्धबलें परिहार्य नसे, युद्धत्याग तयाचा ।
करण्या प्रवृत्त होऊनि अर्जुन, वदला ऐशी वाचा ॥ १ ॥
कीं निःसंशय मोक्षोपाया, दावी मजला कृष्णा ।
तुजविण शमवी कोणी नच ही, माझी या रे तृष्णा ॥ २ ॥
त्याला श्रीहरि मग उपदेशी, द्विविधा निष्ठा पुरती ।
जी कर्मक्षय करुनी देई, अंतीं ज्ञानप्राप्ति ॥ ३ ॥
प्रारब्धक्षय चालू असतां, प्रशस्त केवळ कर्मे ।
आचरितां नर सिद्धचि होतो, सत्कर्मांच्या धर्मे ॥ ४ ॥
यज्ञपुरुष जो तत्प्रीत्यर्थचि, करितां वैदिक कर्में ।
सहजचि आटे भवसरिता ही, हरिच्या प्रसादधर्में ॥ ५ ॥

**ऐकाग्र्यं परमं तपः ॥ तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व ॥ श्रुतिः ॥**

ऐकाग्र्यलाभ सिद्धावस्थे—वीण कदापि न होई ॥
एकैकाग्र्यचि उत्तम तप जें, ज्ञानैक दान देई ॥ ६ ॥
मानवबुद्धी पदोपदीं रत, अनेक कर्मी राही ॥
ह्या संसारीं त्या योगानें, ज्ञान दुरावत जाई ॥ ७ ॥
यास्तव कर्मातीतत्व ह्यें, पुरतें ज्ञानालागी ।
शुद्धैकाग्र्यावीण न लागे, अज्ञानासी आगी ॥ ८ ॥

ज्ञानी पुरुषां कर्तव्य नसे, परि ते कर्में करिती ।
पूर्वीच्या संस्कारें जीं तीं, प्रायः प्रशस्त असती ॥ ९ ॥

ऐसा कर्मज्ञानसमुच्चय, अशक्य ह्या भूवरती ।
असुनी परोपकारक कर्में, संन्यासी बहु करिती ॥ १० ॥

व्यासशुकादिक बहु संन्यासी, होउनि ेले पूर्वी ।
त्यांच्या ज्ञानश्रेष्ठद्वारें, जन उद्धरती उर्वी ॥ ११ ॥

प्रारब्धेतर कर्मीं गीता, क्रियमाणीं नच कांहीं ।
वैदिक कर्माविण स्पर्शी, ज्ञानी ऐसें पाही ॥ १२ ॥

परि हें रहस्य नुमजे-वालां, यास्तव संन्यासातें ।
गौण समजती ते मूढमती, धरुनी दुराग्रहातें ॥ १३ ॥

संन्यासी पूर्णत्वें होता, मम सद्गुरु तो **सांई** ।
तदाश्रयानें हा नीलकंठ, सदाचि निर्भय राही ॥ १४ ॥

## —पुरुषप्रकृति विवेक—

( लावणी )

नरनारी हा मिथ्या भेदा, पुरुष कदापि न गणीं ।
अखंडानंदाचा तो धणी ॥ १ ॥

भेदीं चंचलता ती वसते, शाश्वतता नच जगा ।
अशाश्वतरति ती देते दगा ॥ २ ॥

क्षेत्राठायीं क्षेत्रज्ञजीव, एकात्मता धरी ।
तरिच त्या जन्ममरण आवरी ॥ ३ ॥

जीवेशैक्यें आत्मा वसतो, सर्वत्रचि नित्य तो ।
आत्म्याभव हा नच बाधतो ॥ ४ ॥

ऐशा ज्ञानें मोक्ष लाभतो, प्रकृतिसंग नच बरा ।
त्यागितां तया मुक्तिये घरा ॥ ५ ॥

नरदेहीं वा नारीदेहा, आत्मभिन्नता नसे ।
पुरुष तो उभयीं एकचि असे ॥ ६ ॥

पुरुषाचें चित्प्रतिबिंब धरी, जड प्रकृति एकली ।
भवाची तीच असे माउली ॥ ७ ॥

भिन्न शरीरें निर्मुनिया ती, सुखदुःखा दाखवी ।
पुरुष तो तटस्थ जैसा रवी ॥ ८ ॥

भेदामाजीं भय नित्य वसे, पुरुषीं भीती नसे ।
अखंडानंदीं तो वसतसे ॥ ९ ॥

देह प्रकृति क्षेत्र **पदें** हीं, एकार्था दाविती ।
जडत्वें **पदार्थ** ते राहती ॥ १० ॥

देही पुरुषादभिन्न आहे, पुरुषचि आत्मा असे ।
परेशाविण “ **सत्** ” कांहीं नसे ॥ ११ ॥

सकळहि जग हें निजदेहासह, चित्प्रतिबिंबचि असे ।
चिदात्म्याविण “ **सत्** ” कांहीं नसे ॥ १२ ॥

नरनारींना उपस्थयोगें, बहुतचि सुख वाटतें ।
तयानें सद्बुद्धी बाटते ॥ १३ ॥

प्रकृती जड खेळे निज संगें, भिन्न लिंग निर्मुनी ।
बद्धता दृढ नच त्यासम जनीं ॥ १४ ॥

परस्परांना बद्ध कराया नरनारी निर्मिल्या ।
प्रकृतिनें त्या मायिक बाहुल्या ॥ १५ ॥

मूत्रोत्सर्गाचीं द्वारें जड, सुखदायक तीं कशीं ।
जीव हें नेणुनि पडती फशी ॥ १६ ॥

देवी महिषासुरास सांगे, तत्त्व हेंचि विवरुनी ।
पहावें*भागवतीं सज्जनीं ॥ १७ ॥

सत्कर्माच्या साफल्यानें, दृढभक्त्युद्भव खरा ।
नव्हे तो कर्मत्याग नच बरा ॥ १८ ॥

संसिद्धावस्थेच्या पुढतीं, भक्तांहृदयीं दया ।
एकली राहे निःसंशया ॥ १९ ॥

"**दया धरमका मूल**" असे हें, तुलसीदासें जनीं ।
बोलिलें तें दृढ राहो मनीं ॥ २० ॥

सत्कर्माचें फल भूतदया, वसते भक्तांमनीं ।
दयेविण कर्मा भक्त न गणी ॥ २१ ॥

दया नसावी कदा कुपात्रीं, ऐसें गीता वदे ।
बघावीं कीं तेथिल विशदचि पदें ॥ २२ ॥

"**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्**"
(भ. गी. ४. ८)

श्री तुकयाचे अभंग बहुतचि, यासम असती जनीं ।
वसति ते भक्तांच्या सन्मनीं ॥ २३ ॥

हा नीलकंठ सहज दयाघन, लाभुनिया जन्मला ।
त्या गुणें सांइनाथ तोषला ॥ २४ ॥

आसक्ती केवळ गुरुचरणीं, धरुनी वर्ते जनीं ।
स्तुती वा निंदा सम लेखुनी ॥ २५ ॥

सांइनाथप्रेरित बोला, नीलकंठ वदतसे ।
लागलें भक्तीचें त्या पिसें ॥ २६ ॥

---

*"श्री भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश" ह्यांतील "महिषासुर" शब्द पाहावा.

# —संतासंतवर्णन—

लावणी

श्रद्धा तत्परता इंद्रियजय, साधक ऐशीं धरीं।
साधनें सततचि निज अंतरीं ॥ १ ॥
ऐसा अधिकारी जो साधक, साध्य तयासिच मिळे।
पंडितां तत्त्व न ऐसें कळे ॥ २ ॥
अज्ञान्यासी विकर्म आणिक, अकर्म बाधक असे॥
सुकर्माविण सिद्धि न येतसे ॥ ३ ॥
केवळ ईशात्मक कर्मानें, प्रसन्न होउनि हरी।
देतसे सिद्धावस्था पुरी ॥ ४ ॥
संसिद्धावस्थेच्या योगें, गुरुरूपें श्रीहरी।
साधका भेटुनि त्या उद्धरी ॥ ५ ॥
वैराग्यासम साधन नाहीं, ज्ञानलाभ व्हावया।
परि असे हरिमाया दुर्जया ॥ ६ ॥
मायायोगें साधनमार्गा, अनुसरती ना कुणी।
साधकावस्था दुर्लभ जनीं ॥ ७ ॥
मग सिद्धांची गोष्ट दूर ती, संत तयांतहि कमी।
कथियलें ऐसें निगमागमीं ॥ ८ ॥
प्रापंचिक सुखदु:खें भोगी, तो नर संत न कदा।
तयाला सोडी ना आपदा ॥ ९ ॥
चित्तीं तळमळ राहे तोंवरि, संत कदा होइना।
असंतां शांति मनीं राहिना ॥ १० ॥

शांतीसम सुख नसेचि दुसरें, हें निद्रा दाखवी ।
समाधी आनंदा चाखवी ॥ ११ ॥

आत्यंतिक दुःखनाश होतां, सहजानंदचि उरे ।
तदितरां संतीं ठावचि नुरे ॥ १२ ॥

अखंड सहजानंदीं वसती, संत जडा त्यागुनी ।
शरीरें चेष्टत असतां जनीं ॥ १३ ॥

देहाहंकाराच्या त्यागें, देहकर्म त्यां नुरे ।
देह जैं प्रारब्धा अनुसरे ॥ १४ ॥

उत्कृष्ट प्रारब्धें ऐशी, स्थिति संतां लाभते ।
न मोक्षाविरुद्ध ती शोभते ॥ १५ ॥

प्रारब्धवशात्क्वचित्प्रसंगीं, संतदेह जरि करी ।
कुकर्मे तरि हरि त्यां संहरी ॥ १६ ॥

कारण देहप्रारब्ध असे, ईशाधिन सर्वदा ।
जिवाला नच तें बाधे कदा ॥ १७ ॥

अष्टादश अध्यायीं आणिक तृतियाध्यायीं हरी ।
अर्जुना बोधी ऐशापरी ॥ १८ ॥

देहाहंकारावीण कदा, कर्मा ठावचि नसे ।
तत्त्व हें गीतेमाजी असे ॥ १९ ॥

अनहंकारें कर्म घडे जें, अकर्म तें होतसे ।
अर्जुना कृष्णें कथिलें असे ॥ २० ॥

कर्त्याविण जीं कर्मे घडतीं, जडचेष्टा होत तीं ।
जिवाला किमपि न तीं बाधती ॥ २१ ॥

संतासमीपकर्मोपाधी, कदापि राहत नसे ।
त्याग तो त्यांचा ऐसा असे ॥ २२ ॥

अनहंकारें संत सुकर्मे, अनंत करिती परी ।
तयांची पारख विरळा करी ॥ २३ ॥

अहंममत्वा धरुनी पंडित, करिती ज्या कल्पना ।
त्यांमुळें होती बहु वल्गना ॥ २४ ॥

कर्मज्ञानसमुच्चय वेती, पंडित ते निज शिरीं ।
अशांना " असंत " पदवी बरी ॥ २५ ॥

ज्ञानी आत्मा एकचि दोन्ही, गीता कथिते असें ।
तत्त्व हें विसरूनि होती पिसे ॥ २६ ॥

आत्मा कर्मातीत असोनी, ज्ञानी तैसा पुरा ।
न समजे रहस्य हें पामरा ॥ २७ ॥

हृदयीं कर्माभिमान धरितां, अज्ञानचि तें पुरें ।
जयानें जन्ममरण नावरे ॥ २८ ॥

अहंभाव ज्या मनीं वसतसे, तया ज्ञान होइना ।
कदा अज्ञान दुरी जाइना ॥ २९ ॥

संताविण हें रहस्य इतरां कोठें नुमजे कदा ।
पंडितां अगम्य तें सर्वदा ॥ ३० ॥

संसिद्धावस्था ती अपरा, ज्ञानावस्था परा ।
सिद्ध दे कर्मासी पामरा ॥ ३१ ॥

मग कर्मीं ज्ञान्याची मति ती, रतेल कवण्या गुणें ।
पहातां गुणातीत लक्षणें ॥ ३२ ॥

ऐसा कर्मज्ञानसमुच्चय, थोतांडचि होतसे ।
पंडितीं माजविलें जें पिसें ॥ ३३ ॥

संतांच्या कर्माची महती, कळतां नर उद्धरे ।
केविं हें जाणावें पामरें ? ॥ ३४ ॥